Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844839

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सत्यशोधक समाजाविषयीचे कार्य

**प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे**[1]

एकोणिसाव्या व विसाव्या शतकाच्या संधिकालात महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जीवनात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडून आले. जातिभेद, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता, शिक्षणाचा अभाव आणि शोषण यांसारख्या समस्यांनी समाज ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत महात्मा जोतीराव फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने सामाजिक समता, मानवतावाद, शिक्षणप्रसार आणि ब्राह्मणेतर चळवळीचा पाया घातला. सत्यशोधक समाजाच्या विचारधारेने पुढील पिढीतील अनेक समाजसुधारक घडविले. त्यांपैकी एक प्रभावी आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ.पंजाबराव देशमुख होत.

डॉ.पंजाबराव देशमुख हे केवळ एक शिक्षणतज्ज्ञ किंवा राजकीय नेते नव्हते, तर ते सत्यशोधक विचारांचे कट्टर समर्थक व समाजसुधारणेचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या मूलभूत तत्त्वांना समाजातील समता, शोषणमुक्ती, शिक्षणाचा प्रसार, शेतकरी व कामगार वर्गाचा उत्कर्ष या मूल्यांना आपल्या कार्यातून मूर्त स्वरूप दिले. शिक्षण, विशेषतः ग्रामीण व दुर्बल घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करणे, हे त्यांच्या कार्याचे केंद्रबिंदू होते.

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांशी सुसंगत असे कार्य शिक्षणसंस्था स्थापन करून, सामाजिक जागृती करून, शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडून आणि राजकीय व्यासपीठावरून सामाजिक न्यायाचा आग्रह धरून केले. त्यांच्या कार्यातून सत्यशोधक चळवळ केवळ वैचारिक स्तरावर न राहता प्रत्यक्ष सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरली.

प्रस्तुत शोध निबंधात डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सत्यशोधक समाजाशी असलेले वैचारिक नाते, त्यांच्या सामाजिक-शैक्षणिक कार्यातील सत्यशोधक तत्त्वांचा प्रभाव, तसेच त्यांच्या कार्याचे महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीवरील दूरगामी परिणाम यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या अभ्यासातून सत्यशोधक समाजाच्या विचारांची आधुनिक काळातील उपयुक्तता आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

२३ सप्टेंबर १८७३ मध्ये महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची पुण्याला स्थापन केली.[i] लवकरच या सत्यशोधक समाजाचा विदर्भात मोठया प्रमाणावर प्रसार झाला. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात झाली त्यावेळी विदर्भात सत्यशोधक समाजाचे कार्य फार मोठया प्रमाणावर सुरू होते. अखिल भारतीय सत्यशोधक परीशदेचे अधिवेशन इ. स. १९२५ च्या डिसेंबरमध्ये मुंबई प्रांताचे शिक्षणमंत्री ना. भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली अमरावतीला झाले.[ii] विदर्भात सत्यशोधक समाजाचे प्राबल्य असल्याचेच ते प्रतीक होते.

डॉ. पंजाबराव देशमुख हे सत्यशोधक समाजाचे कायदेशीर सदस्य नव्हते; पण त्यांचे कार्य हे एका सत्यशोधकाचे होते. पंढरीनाथ पाटील यांच्यासारखे महान सत्यशोधकी कार्यकर्ते अनेक कार्यात त्यांच्यासोबत होते. श्री पंढरीनाथ पाटील व

[1] इतिहास विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

डॉ.पंजाबराव देशमुख यांचे विचार जुळत असत. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी केलेले अनेक कार्य सत्यशोधक समाजाला पोशक होते. त्यामुळे त्यांच्या आजुबाजुला त्यांना मदत करायला जे लोक पुढे आले त्यात सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांची सख्या जास्त होती. डॉ. पंजाबराव देशमुख यांनीही कार्यची निकड लक्षात घेऊन त्यांचा आपल्या कार्यसिद्धीसाठी उपयोग करून घेतला. डॉ. पंजाबराव देशमुख यांची विचारसरणी ही सत्यशोधक समाजाच्या जवळजाणारी असली तरी ते स्वतंत्र विचाराचे व्यक्ती होते. त्यांनी स्वतःला एखद्या विषिश्ट विचारसरणीत कधीच बांधून घेतले नाही.

जुन्या रुढी, परंपरा, अंधश्रद्धा व जातिभेद यामुळे विस्कटलेला समाज, उच्चवर्णीय म्हणजेच विशेषता ब्राह्मण समाजाकडून होणारा विविध प्रकारचा छळ, शोषण आदि विरूद्ध सर्वप्रथम महात्मा फुल्यांनी आवाज उठविला. त्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. सत्यशोधक समाज अल्पावधीतच साऱ्या महाराष्ट्रभर पसरला. या सत्यशोधक समाजाचे विचार लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी सत्यशोधक समाजाच्या अनुयायांनी सत्यशोधक जलशे तयार केले. त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची भूमिका महत्वाची होती. या सत्यशोधक तमाशाच्या माध्यमातून विविध प्रकारचे कार्यक्रम गावोगावी जाऊन लोकांना फुकट दाखवले जात असत. विषेश म्हणजे तमाशा मालकांनी हे तमाशे स्वतःच्या खर्चाने चालविले होते आणि लोकमानसात जागृती निर्माण केली होती. अशा जलशामुळे स्वातंत्र्य आन्दोलनास, सामाजिक सुधारणेस चांगला फायदा झाला. त्यामुळे सामाजिक प्रबोधन झाले. सत्यशोधक जलशामुळे समाजात ब्राह्मण जाती विरूद्ध वातावरण तयार झाले. या जातीने आपल्याला कसे लुटले, देवाची भिती दाखवून धार्मिक विधीत कसे गुंतवून ठेवले. हे प्रत्यक्ष तमाशात विविध प्रकारे संवाद, गाणी, पोवाडे याच्या माध्यमातून हावभावा सहीत लोकांसमोर मांडले जात होते.

ज्याकाळात तमाशाला फारशी सामाजिक प्रतिष्ठा नव्हती त्या काळात तमाषाच्या माध्यामातून जनजागृती करता येते, या विषयी डॉ.पंजाबराव देशमुखांच्या मनात कोणतीच शंका नव्हती. डॉ. पंजाबराव देशमुखांनी आपल्या वकिली व्यवसायातील पहिली केस गुलाबराव नायगावकरांची घेतली व कोर्टात युक्तीवाद करतांना त्यांनी म्हटले. "तमाशा मार्फत एक मनोरंजनात्मक सामाजिक सेवाच केली जाते, लोक जागृती केली जाते, सामाजिक शिक्षण दिले जाते, कलेला वाव दिला जातो प्रोत्साहन दिले जातो, गरीबांचे मनोरंजन केले जाते."[iii] असे प्रभावी मुद्दे मांडले व केस जिंकली. डॉ. पंजाबराव देशमुखांमुळे त्यात काम करणाऱ्या कलाकारांची निर्दोश सुटका झाली व त्यांना सामाजिक प्रतिश्ठा मिळाली. नंतरच्या काळातही डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सत्यशोधक जलसे करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन दिले.

**निष्कर्ष :**

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारधारेतून सामाजिक समता, शिक्षणप्रसार आणि शोषित-वंचित घटकांच्या उत्थानासाठी जे कार्य केले, ते आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. महात्मा जोतीराव फुले यांनी मांडलेल्या सत्यशोधक समाजाच्या मूलतत्त्वांचा स्वीकार करून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी त्या विचारांना व्यवहार्य स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. समाजातील जातिभेद, अज्ञान, अंधश्रद्धा आणि आर्थिक शोषण याविरुद्ध त्यांनी सातत्याने भूमिका घेतली.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या ठाम भूमिकेतून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ग्रामीण व मागासवर्गीय समाजासाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. शेतकरी, कामगार व दलित समाजाच्या प्रश्नांबाबत त्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जागृती निर्माण केली. त्यांचे कार्य केवळ वैचारिक पातळीवर मर्यादित न राहता सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात प्रत्यक्ष कृतीच्या स्वरूपात दिसून येते.

सत्यशोधक समाजाच्या समतावादी आणि मानवतावादी विचारांचा प्रसार करताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सामाजिक ऐक्य, विवेकवाद आणि आत्मसन्मान या मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण समाजात नवचैतन्य निर्माण झाले व सामाजिक सुधारणांच्या चळवळीला बळ मिळाले. त्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सत्यशोधक समाजा विषयीचे कार्य हे महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी योगदान म्हणून निश्चितच मान्य करावे लागते.

**संदर्भ सूची :**

[i] पाटील, पंढरीनाथ सीताराम, महात्मा जोतिराव फुले यांचे चरीत्र, औरंगाबाद, लोकसाहित्य प्रकाशन, २०१५,पृ. क्र. ४६.

[ii] मोहिते, वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, अमरावती, मराठी ज्ञान मंदीर, १९६३, पृ. क्र. ३२४.

[iii] पवार, डॉ. जयसिंगराव, राजर्षी छत्रपती शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी,२००९, पृ. क्र. १४४.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*